# Cyber Awareness Seminar

गावकरी उपस्थित राहणार आहेत.

## रामटेकच्या किटस् महाविद्यालयात सायबर गुन्ह्यांबाबत जनजागरण

### सायबर गुन्हे सुरक्षाविषयी जनजागृती कार्यशाळा



इंटरनल सिक्युरिटी या पुस्तिकेचे प्रकाशन करताना पो. अ. लोहीत मतानी, अप्पर पोलिस अधीक्षक मोनिका राऊत व अन्य

शहर वार्ताहर / रामटेक

जनजागृती व इंटरनेटचा सुरक्षित वापर हाच सायबर गुन्ह्यांवरील मोठी उपाययोजना असल्याचे मत रामटेक येथे गुरुवार १८ जानेवारी रोजी झालेल्या सायबर गुन्हे सुरक्षाविषयी कार्यशाळेत सर्वच वक्त्यांनी केले. यासाठी पोलिस विभाग सातत्याने प्रयत्न करीत असल्याने जनतेने पोलिसांना सकारात्मक व सक्रिय मदत करण्याचे आवाहन केले.

रामटेकच्या किटस् अभियांत्रिकी महाविद्यालयात झालेल्या या कार्यक्रमाचे उद्‌घाटन नागपूर ग्रामीण पोलिसच्या अप्पर पोलिस अधीक्षक मोनिका राऊत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी रामटेकचे सहा. पोलिस अधीक्षक लोहीत मतानी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामरतन लाल, ॲक्सिस बँकेचे अधिकारी थॉमस जॉन, सायबर सेलचे पोलिस निरीक्षक संजय पाटील, सपोनि अरविंद सराफ, रामटेकचे पोनि योगेश पारधीसह आदी मान्यवर हजर होते.

सध्याच्या युगात सोशल मीडियाचा वापर तरूणवर्ग मोठ्या प्रमाणावर करत आहे. मात्र, सर्वच स्तरांतील लोक याचा वापर मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. सरकारही डिजिटल इंडियाची वाटचाल करताना कॅशलेस व्यवहाराला प्रोत्साहन देत आहे. परंतु, हे सर्व करताना सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे. सावधगिरी न बाळगल्याने ऑनलाईन व्यवहारांत अनेक कोटी रुपयांनी फसवणूक झाल्याचे नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणांत दिसून आले आहे. यामध्ये महाराष्ट्र व अनेक राज्ये आघाडीवर आहेत. अश्लिलता गुन्ह्यांमध्ये तर दुपटीने वाढ झाली आहे. सायबर गुन्हे आपल्या राज्यात घडत असताना आपला नागपूर जिल्हा मागे नाही. राज्यात नागपुरचा क्रमांक तिसरा असल्याचे यावेळी वक्त्यांनी सांगितले.

यासाठी इंटरनेट व ऑनलाईन देवाणघेवाण करणाऱ्यांना जागृत करणे हा मोठा प्रतिबंधात्मक उपाय असल्याने या कार्यशाळा आयोजित केल्या जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. लोहीत मतानी यांनी लिहिलेल्या इंटरनल सिक्युरिटी या पुस्तकाचे यावेळी मोनिका राऊत यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. लोहीत मतानी, थॉमस जॉन, संजय पाटील आदींनी यावेळी उपरोक्त विषयांवर आपले विचार व्यक्त केले. सायबर सेलचे अजय तिवारी यांनी पीपीटी प्रेझेंटेशनच्या सहाय्याने सायबर गुन्हे, त्याचे स्वरूप व त्यावर उपाय या सर्व बाबी उपस्थितांना तपशीलवार समजावून सांगितल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. प्राचार्य रामरतनलाल यांनी कार्यशाळेची माहिती दिली. आयोजनासाठी पोलिस अधिकारी मल्हारी ताळीकोटे व त्यांचे सर्व सहकारी, कीट्सचे प्राध्यापक व अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या एनसीसी युनीटने अति पोलिस अधीक्षक मोनीका राऊत यांना सलामी दिली.

# सायबर गुन्हे सुरक्षाविषयी जनजागृतीपर कार्यशाळा वि

## विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





कार्यशाळेप्रसंगी उपस्थित उपविभागीय पोलिस अधिकारी जयस्वालसह अन्य अधिकारी व विद्यार्थिनी

**शहर वार्ताहर / उमरेड**

नवीन वर्षाच्या प्रारंभीच उमरेड परिसरात सायबर गुन्हाचे प्रमाण वाढल्याचे दिसते. परिसरात कोणतीही अनुचित घटना घडायला नकोत. हा दृष्टीकोन ठेवून सायबर सेलच्यावतीने व्हीआयटी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये नुकतेच सायबर गुन्हे सुरक्षाविषयी जनजागृती कार्यशाळा पार पडली.

कार्यशाळेत प्रामुख्याने आजच्या विज्ञानयुगामध्ये मोबाईल तसेच कॉम्प्युटरच्या माध्यमातून होणारे गुन्हे तसेच काही फसवणूक व्हायला नकोत व आपल्याकडून सुद्धा या प्रकारचे गुन्हे घडायला नकोत, यासाठी नागपूर रोडवर असलेल्या चक्रीघाट या ठिकाणी असलेल्या व्हीआयटी या इंजिनियरींग कॉलेजमध्ये सायबर गुन्हे सुरक्षेविषयी जनजागृती अभियान सायबर सेलतर्फे घेण्यात आले. सायबर एक्सपर्टच्या वतीने लोकांच्या तसेच मुलींच्या फसवणुकीच्या घटना घडायला नको. अशा होणाऱ्या घटनांना आपणसुद्धा प्रतिसाद द्यायचा नाही, असे मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अप्पर पोलिस अधीक्षक मोनिका राऊत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये सर्व विद्यार्थ्यांना या अशाप्रकारच्या होणाऱ्या फसवणुकीपासून सर्व मुली तसेच मुलांना सावध राहण्याचा सल्ला दिला. आपल्या सभोवताली किंवा मित्रासोबत काही अनिष्ठ प्रकार घडत असल्यास त्वरित आपल्या जवळच्या पोलिस स्टेशनला कळवा, असे आवाहन केले.

कार्यशाळेला सायबर सेलचे पोलिस निरीक्षक संजय पाटील, सायबर तज्ज्ञ सचिन साथे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील जयस्वाल, उमरेडचे पोलिस निरीक्षक प्रकाश हाके, कुहीचे ठाणेदार गोमखे, राजेंद्र चव्हाण तसेच व्हीआयटी संचालक जितेश माहेश्वरी, प्राचार्य नीलेश बोडणे, आयसीआयसीआय बँकेचे कमलेश वालदे यांची कार्यशाळेला उपस्थिती होती. आयोजनासाठी कॉलेजचे विद्यार्थी, कर्मचारी व उमरेड पोलिस कर्मचाऱ्यांनी सुद्धा सहकार्य केले.